# उल्हासनगर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६, विस्तार क्र.२२५ proumc321@gmail.com


०१/०९/२३ ११:३०

दिनांक : ३१/०८/२०२३

## प्रेसनोट

केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ तसेच महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल विभागाकडून प्राप्त निर्देशानुसार शहरातील नैसर्गिक जलस्त्रोतांमध्ये होणारे प्रदुषण रोखण्यासाठी प्लास्टर ऑफ पॅरीस वापरावर बंदी घालण्यात आलेली आहे. तसेच शहरात आगामी काळात येणा-या गणेशोत्सवा दरम्यान पर्यावरण सण साजरे करण्यासंबधी नागरीकांमध्ये प्रसारमाध्यम, सोशल मिडीया इत्यादींद्वारे जनजागृती करणेबाबत देखील निर्देश प्राप्त झाले आहेत .

त्या अनुषंगाने महापालिका आयुक्त श्री. अजीज शेख, मा. अति. आयुक्त डॉ. करुणा जुईकर, मा. उप आयुक्त (पर्यावरण) डॉ. सुभाष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरण विभागप्रमुख सौ. विशाखा सावंत यांनी विभागामार्फत उल्हासनगर शहरातील नागरीकांसाठी घरगुती गणेशोत्सव स्पर्धेचे आयोजन केले आहे .

सदर कार्यक्रमादरम्यान पत्रकार यांनी सदर स्पर्धा घरगुती नागरीकांसाठी मर्यादीत न ठेवता सार्वजनिक उत्सव मंडळांकरीता देखिल नियोजन करावे असा आग्रह धरला. त्यांस मा. आयुक्त महोदय यांनी संमती दर्शविली.

सदर स्पर्धेमध्ये सहभागी होण-या नागरीकांमधुन विजेते निवडण्यात येणार असुन त्यांना रोख रक्कम व सन्मानचिन्हे देवून गौरविण्यात येणार आहे .

सदर स्पर्धेची नागरीकांना माहिती होवुन जास्तीत-जास्त नागरीकांनी स्पर्धेमध्ये सहभागी व्हावे याकरीता आवाहन करणेच्या उद्देशाने दिनांक २९/०८/२०२३ रोजी महापालिका आयुक्त श्री.अजीज शेख यांच्या हस्ते स्पर्धेचा QR Code, वेबसाईड, टि-शर्ट व पोस्टरचे अनावरण करण्यात आले. यावेळी सदर ठिकाणी महापालिकेचे उपायुक्त श्री. अशोक नाईकवाडे, सहा. संचालक, नगररचनाकार श्री. खोब्रागडे, मुख्य लेखा परिक्षक श्री. देशमुख, मुख्य लेखा अधिकारी श्री. किरण भिलारे, श्री. दत्तात्रय जाधव, श्री. विनोद केणी, श्री. अंकुश कदम, श्री. परमेश्वर बुडगे, श्रीम. मोहिनी धर्मा, सौ. छाया डांगळे, जनसंपर्क अधिकारी, श्री. महेंद्र धिंडे व इतर कर्मचारी व पत्रकार बंधु उपस्थित होते.

सदर कार्यक्रमामध्ये सोहम फाऊंडेशनचे श्री. राजेश देठे, वृक्ष फाऊंडेशनच्या श्रीम. ज्योती तायडे, केसरी गणेश मित्र मंडळाचे श्री. सतिश मराठे हे देखील उपस्थित होते.

३१/८/२३

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
   - सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.